।। विष्णुविण जप व्यर्थ त्याचे ज्ञान ।।
श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित
# दिलीप वळसे पाटील
## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
मु. पो. निमगाव सावा, ता. जुन्नर, जि.पुणे. ४१०५०४ Mob : 9503549614 / 8317
संस्थापक – अध्यक्ष : मा.श्री.पांडुरंगजी पवार (M.Com) मा.उपाध्यक्ष, जि. प. पु
● Website - www.dvpcollege.com ● Email-dpc_nimgaon ...ediffmail.com
* महाराष्ट्र शासन नोंदणी क्र.एन.जी.सी.२००९/(१५२/०९) मशि-०४ दि.११/०७/२००९ * पुणे विद्यापीठ आय.डी.क्र.पी.यु./पी.एन./...३८/२००९

NSS Record Page No. 179 to 212

179

जावक क्र. : 3.4.3 दिनांक : 14/07/23

lumber of extension and outreached Programmes conducted by the institution through NSS/NCC/Red Cross /YRC etc. (including the progrmmes such as wachha Bharat, AIDS awareness Gender issues etc. and /those orgnised in collaboration with industry ,community and NGOs during the last five years

| | 2017-18 |
|---|---|
| Sr.No. | Name of the activity |
| 1 | Tree Planting and Conservation Activities 17 Sep: Tree Plantation |
| 2 | National Service Scheme Din |
| 3 | Swachhayata Abhiyaan |
| | 2018-19 |
| 1 | Marathi Rajyabhsha Din |
| 2 | Environment Day |
| 3 | Rajeev Gandhi Jayanti |
| 4 | Plastic Free Abhiyaan |
| 5 | Gurupournima Celebrate |
| | 2019-20 |
| 1 | Swachhayata Abhiyaan |
| 2 | Marathi Bhasha Din |
| 3 | Supply of Ration for Kolhapur Flood |
| | 2020-21 |
| 1 | Mask Distribution |
| 2 | COVID Awareness |
| | 2021-22 |
| 1 | Literacy Din |
| 2 | Corona Awareness |
| 3 | Constitution Din |
| 4 | Mahaparinirvaan Din |

D V P College Nimgaon Sawa

Principal
Dilip Walase Patil
Arts, Commerce & Science College

| | |
|---|---|
| 5 | Savitribai Phule Jayanti |
| 6 | Yuva Din |
| 7 | Yoga Din |
| 8 | Gramswachhata |
| 9 | Matdaar Din |
| 10 | Marathi Rajyabhasha Din |
| 11 | Sanitizer and Mask distribution |
| 12 | Blood Donation Camp |
| | 2022-23 |
| 1 | Amrut Mahotsav Program |
| 2 | Constitution Din |
| 3 | Mahaparinirvaan Din |
| 4 | Savitribai Phule Jayanti |
| 5 | Yuva Din |
| 6 | Health Committee |
| 7 | Marathi Bhasha Din |
| 8 | National Science Day |
| 9 | Women Empowernment Program |
| 10 | Cooking and Mehendi Competition |
| 11 | Ambedkar Jayanti |
| 12 | Ahilyabai Holkar Jayanti |
| | |

Principal

**Principal**
Dilip Walase Patil
Arts, Commerce & Science College
Nimgaonsawa, Tal.Junnar (Pune)

3.4.3

Year-2018

Number of extension and outreached Programmes conducted by the institution through NSS/NCC/Red Cross /YRC etc. (including the progrmmes such as Swachh Bharat,AIDS

AIDS awareness Gender issues etc. and /those orgnised in collaboration with industry ,community and NGOs during the last five years

| Sr.No | Name of the activity | Organising unit / agency//collaborating agency | Name of the Scheme | Year of the activity |
|---|---|---|---|---|
| 1 | Marathi Rajyabhsha Din | College Level | N.S.S | 27-Feb-18 |
| 2 | Environment Day | College Level | N.S.S | 05-Jun-18 |
| 3 | Rajeev Gandhi Jayanti | College Level | N.S.S | 20-Aug-18 |
| 4 | Plastic Free Abhiyaan | College Level | N.S.S | 27-Sep-18 |
| 5 | | | | |

Principal
Dilip Walase Patil
Arts, Commerce & Science College
Nimgaonsawa, Tal.Junnar (Pune)

## Year-2019

Number of extension and outreached Programmes conducted by the institution through NSS/NCC/Red Cross /YRC etc. (including the progrmmes such as Swachh Bharat,AIDS

| Sr.No | Name of the activity | Organising unit / agency//collaboratin | Name of the Scheme | Year of the activity |
|---|---|---|---|---|
| 1 | Swachhayata Abhiyaan | College Level | N.S.S | 21-Sep-19 |
| 2 | Marathi Bhasha Din | College Level | N.S.S | 27-Feb-19 |
| 3 | Supply of Ration for Kolhapur Flood | College Level | N.S.S | 2019 |

D.V.P. College Nimgaon Sa...

Principal
Dilip Walase Patil
Arts, Commerce & Science Coll.
Nimgaonsawa, Tal.Junnar (Pune)

182

| Year - 2020 | | | | |
|---|---|---|---|---|
| Number of extension and outreached Programmes conducted by the institution through NSS/NCC/Red Cross /YRC etc. (including the progrmmes such as Swachh Bharat,AIDS | | | | |
| AIDS awareness Gender issues etc. and /those orgnised in collaboration with industry ,community and NGOs during the last five years | | | | |
| Sr.No. | Name of the activity | Organising unit / agency//collaborating agency | Name of the Scheme | Year of the activity |
| 1 | Mask Distribution | College Level | N.S.S | 2020-21 |
| 2 | COVID Awareness | College Level | N.S.S | 2020-21 |

Principal
Dilip Walase Patil
Arts, Commerce & Science College
Nimgaonsawa, Tal.Junnar (Pune)

DVP College Nimgaon Sawa

153

## Year - 2021

Number of extension and outreached Programmes conducted by the institution through NSS/NCC/Red Cross /YRC etc. (including the progrmmes such as Swachh Bharat,AIDS

AIDS awareness Gender issues etc. and /those orgnised in collaboration with industry ,community and NGOs during the last five years

| Sr.No. | Name of the activity | Organising unit / agency//collaborating agency | Name of the Scheme | Year of the activity |
|---|---|---|---|---|
| 1 | Literacy Din | College Level | N.S.S | 08-Sep-21 |
| 2 | Corona Awareness | College Level | N.S.S | 12-Nov-21 |
| 3 | Constitution Din | College Level | N.S.S | 26-Nov-21 |
| 4 | Mahaparinirvaan Din | College Level | N.S.S | 06-Dec-21 |
| 5 | Savitribai Phule Jayanti | College Level | N.S.S | 03-Jan-22 |
| 6 | Yuva Din | College Level | N.S.S | 12-Jan-22 |
| 7 | Yoga Din | College Level | N.S.S | 27-Jan-22 |
| 8 | Gramswachhata | College Level | N.S.S | 11-Feb-22 |
| 9 | Matdaar Din | College Level | N.S.S | 25-Jan-22 |
| 10 | Marathi Rajyabhasha Din | College Level | N.S.S | 27-Feb-22 |
| 11 | Sanitizer and Mask distribution | College Level | N.S.S | 24-Feb-21 |

DVP College Nimgaon Sawa

Principal
Dilip Walase Patil
Arts, Commerce & Science College
Nimgaonsawa, Tal.Junnar (Pune)

184

| Year - 2022 | | | | |
|---|---|---|---|---|
| Number of extension and outreached Programmes conducted by the institution through NSS/NCC/Red Cross /YRC etc. (including the progrmmes such as Swachh Bharat,AIDS AIDS awareness Gender issues etc. and /those orgnised in collaboration with industry ,community and NGOs during the last five years | | | | |
| Sr.No. | Name of the activity | Organising unit / agency//collaborating agency | Name of the Scheme | Year of the activity |
| 1 | Amrut Mahotsav Program | College Level | N.S.S | 15-Aug-22 |
| 2 | Constitution Din | College Level | N.S.S | 26-Nov-22 |
| 3 | Mahaparinirvaan Din | College Level | N.S.S | 06-Dec-21 |
| 4 | Savitribai Phule Jayanti | College Level | N.S.S | 03-Jan-23 |
| 5 | Yuva Din | College Level | N.S.S | 12-Jan-23 |
| 6 | Marathi Bhasha Din | College Level | N.S.S | 27-Feb-23 |
| 7 | National Science Day | College Level | N.S.S | 28-Feb-23 |
| 8 | Women Empowernment Program | College Level | N.S.S | 08-Mar-23 |
| 9 | Cooking and Mehendi Competition | College Level | N.S.S | 12-Mar-23 |
| 10 | Ambedkar Jayanti | College Level | N.S.S | 14-Apr-23 |
| 11 | Ahilyabai Holkar Jayanti | College Level | N.S.S | 31-May-23 |

Principal
Dilip Walase Patil
Arts, Commerce & Science College
Nimgaonsawa, Tal.Junnar (Pune)

185

186

2017

# नारायणगडावर एक टन कचरा गोळा

## नारायणगाव महाविद्यालय, रोटरी क्लबकडून स्वच्छतेचा उपक्रम



नारायणगड (ता. जुन्नर) : किल्ले नारायणगड पायरी मार्गाची स्वच्छता करताना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी.

नारायणगाव, ता. २२ : रोटरी क्लब नारायणगाव, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव यांच्यातर्फे किल्ले नारायणगड परिसरात स्वच्छता अभियान घेण्यात आले. या उपक्रमात ३२० विद्यार्थ्यांनी भाग घेऊन एक टन कचरा गोळा केला, अशी माहिती रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. प्रशांत कापसे यांनी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्वच्छता अभियानांतर्गत किल्ले नारायणगड परिसरात स्वच्छता अभियान घेण्यात आले. या उपक्रमात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव, दिलीप वळसे पाटील महाविद्यालय निमगावसावा, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर, एस. आर. शिंदे महाविद्यालय बोरी बुद्रुक या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा [illegible]

दि. 23 ऑगस्ट 2017.

# निमगाव सावा येथे स्वच्छताविषयक जागृती

आळेफाटा, ता. २६ : निमगाव सावा (ता. जुन्नर) येथे दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त गावातून स्वच्छता फेरी काढून पथनाट्याच्या माध्यमातून स्वच्छताविषयक जनजागृती केली.

निमगाव सावा येथे दिलीप वळसे पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, बस स्थानक परिसरात स्वच्छता मोहीमही राबविली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रल्हाद शिंदे, निमगाव सावा गावचे उपसरपंच गोविंद गाडगे, जिजाभाऊ थोरात उपस्थित होते. या फेरीमध्ये स्वच्छताविषयक घोषवाक्यांचे फलक घेऊन, घोषणा देत नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. या वेळी पथनाट्याच्या माध्यमातून 'हॅलो' कार्यक्रम सादर करून स्वच्छ हात धुण्याचे [illegible]



निमगाव सावा (ता. जुन्नर) : दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त काढलेली स्वच्छताविषयक जनजागृती फेरी.

[illegible]

D V P College * Nimgaon Sawa *

187

2017

# निमगावसावा येथे स्वच्छतेविषयी जनजागृती.



निमगावसावा : येथे ग्रामस्वच्छता करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी. (छाया : मोहन मुठे)

। खोडद : प्रतिनिधी

निमगाव सावा (ता. जुन्नर) येथील पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त 'रासेयो' विभागाच्या वतीने गावात 'स्वच्छता हिच सेवा' हा संदेश देत स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात आली.

या स्वच्छता फेरीत पथनाट्याद्वारे 'स्वच्छ हात धुण्याचे फायदे' समजावून सांगत. यामध्ये गावातील नागरिकांना सहभागी करून प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. अनेक संसर्गजन्य आजारांचे मूळ हे आपल्या हातावरील [illegible] असल्यामुळे [illegible] महाविद्यालयात पोस्टर आणि निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी [illegible] गाडगे, निवृत्ती गाडगे, इब्राहीम पटेल, प्रा. अनिल पडवळ [illegible] प्रा. [illegible] गवारी यांनी [illegible]. स्वच्छता फेरीतून स्वच्छतेचे महत्त्व समाजापर्यंत पोहचविल्याने संस्थेचे अध्यक्ष व पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य पांडुरंग पवार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

D.V.P. College Nimgaon Sawa

४२

# राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त निमगाव सावात स्वच्छता फेरी

निमगाव सावा (प्रतिनिधी) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सलग्नीत श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निमगाव सावा येथे राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रविवार दिनांक २४ सप्टेंबर २०१७ रोजी स्वच्छता फेरीचे आयोजन केले होते. त्यातून 'स्वच्छता हिच सेवा २४ सप्टेंबर हा राष्ट्रीय सेवा योजना दिन महाविद्यालयात उस्फूर्तपणे साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित केलेल्या स्वच्छता फेरीत पथनाट्याद्वारे 'स्वच्छ हात धुण्याचे फायदे' hand wash program सादर करून त्यामध्ये गावातील नागरिकांना सहभागी करून प्रात्याक्षिके केली. अनेक संसर्गजन्य आजाराचे मूळ हे आपल्या हातावरील किटाणु असल्याने त्याचा नायनाट करण्याविषयी जनजागृती केली. तसेच शाळा, सरकारी दवाखाना, बस स्थानक या सार्वजनिक ठिकाणी विद्यार्थ्यांनी स्वच्छता केली. सदरचा 'स्वच्छता हिच सेवा' हा उपक्रम २ ऑक्टोबर 'महात्मा गांधी जयंती पर्यंत राबविण्यात येणार आहे. यासाठी महाविद्यालयात पोस्टर आणि निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रल्हाद शिंदे, निमगावचे उपसरपंच गोविंद गाडगे, जिजाभाऊ थोरात, निवृत्ती गाडगे, इब्राहीम पटेल, ग्रामस्थ, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. विश्वास गवारी यांनी सर्व शिक्षकांच्या सहकार्याने केले. सदरच्या स्वच्छता फेरीतून स्वच्छतेचे महत्त्व समाजापर्यंत पोहचविल्याने संस्थेचे अध्यक्ष व पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य मा.पांडुरंग पवार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले असल्याची माहिती प्रा. अनिल पडवळ यांनी दिली.

2019

स्वच्छता अभियान

DWP College Nimgaon Sawa

२०



निमगाव सावा येथे स्वच्छता करताना विद्यार्थी.

## निमगाव सावा येथे स्वच्छता अभियान

**खोडद :** श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने निमगाव सावा (ता. जुन्नर) येथे ग्राम स्वच्छता अभियान राबविले. यात राष्ट्रीय सेवा योजना, कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. ग्रामपंचायत परिसर आणि गावातील मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी साफसफाई केली. बाजारतळ, संत मनाजी बाबा चौक, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्रवेशद्वार येथे साफसफाई केली. जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग पवार, सरपंच सुनीता घोडे, उपसरपंच नजीर चौगुले, सचिन बेहेडे यांच्यासह प्राचार्य डॉ. व्ही. एस. जोशी उपस्थित होते.

दै. पुढारी २७ सप्टेंबर २०१९

२१



निमगाव सावा (ता. जुन्नर) : येथील दिलीप वळसे पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गावात स्वच्छता अभियान राबवले.

## वळसे पाटील महाविद्यालयाचे स्वच्छता अभियान

**खोडद -** निमगाव सावा (ता. जुन्नर) येथील श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाने निमगाव सावा गावात ग्राम स्वच्छता अभियान राबविल्याची माहिती विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिकारी प्रा. दर्शन शेलार यांनी दिली. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांनी स्वछता अभियानात उत्स्फूर्तपणे भाग घेतला. गावातील मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी, तसेच बाजारतळ, संत मनाजी बाबा चौक, प्राथमिक आरोग्य केंद्र, गावाचे प्रवेशद्वार या परिसरात साफसफाई केली. यावेळी पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आणि विद्यमान सदस्य पांडुरंग पवार यांनी पाहणी करून विद्यार्थ्यांनी असे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज असल्याचे सांगितले. या अभियानात निमगाव सावाच्या सरपंच सुनीता घोडे, उपसरपंच नजीर चौगुले, सचिन बेहेडे यांसह ग्रामस्थ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. जोशी आणि सर्व प्राध्यापक उपस्थित होते. स्वछता अभियानाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रकाश कांबळे यांनी केले.

दै. प्रभात २७ सप्टेंबर २०१९

(2019)

189

D V P College Nimgaon Sawa

पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात उपक्रम

## निमगाव सावामध्ये आंब्याच्या पन्नास रोपांची लागवड





स्वच्छता करताना निमगाव सावा महाविद्यालयातील स्वयंसेवक.

## राष्ट्रीय सेवा योजनेचे काम कौतुकास्पद

खोडद : राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून स्वच्छतेचे व समाजप्रबोधनाचे काम हे त्या गावामध्ये सामाजिक कार्याला व गावच्या एकसंध विचाराला चालना देण्याचे काम करते, असे प्रतिपादन प्रगतशील शेतकरी संभाजी चव्हाण यांनी केले. श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचालित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, निमगावसावाच्या पारगाव तर्फे आळे (ता. जुन्नर) येथे सुरू असणाऱ्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर समारोप समारंभप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग पवार होते. या वेळी जुन्नर पंचायत समितीचे माजी उपसभापती शिवाजीराव चव्हाण यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे केलेल्या कामाबद्दल कौतुक केले. या वेळी संस्थेचे सचिव गणपत घोडे, डॉ. शशिकांत साळवे, राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी प्रांजल विश्वासराव, मंगेश गावशेते, प्रियांका डुकरे यांनी मनोगते व्यक्त केली. याप्रसंगी प्रकाश चव्हाण, किरण तट्टू, नवनाथ डुकरे, शांताराम डुकरे, अजित डुकरे, प्रशांत तट्टू, गेनभाऊ तट्टू, शरद डुकरे, अक्षय सोनवणे, प्रा. राजू जगताप, प्रकाश कांबळे, सुभाष घोडे, रावसाहेब थोरात, शीतल ढवळे, सविता पिंगट, ज्योती अहिनवे, ज्योती जगदाळे, वसंत गाडगे, विनायक लामखडे, वैभव घोडे, शांताराम गाडगे, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन शाकुराव कोरडे यांनी केले, तर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. विश्वास गवारी यांनी आभार मानले.

सकाळचा शिलेदार 190

(2020) - (2021)

मास्कचे वाटप

D V P College
Nimgaon Sawa



# कराटे प्रशिक्षण (2021)

D... College ... Nimgaon Sawa





(2021)



# राज्यघटनेचा आदर करावा : पांडुरंग पवार

जुन्नर (स. गांवकरी) : श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती निमित्ताने जि प स पांडुरंग पवार यांनी डॉ.आंबेडकरांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून मनोगत व्यक्त करताना म्हणाले जगातील एकमेव व्यक्ती की ज्यांनी रक्ताचा एक थेंबही न सांडता आपल्या लेखणीच्या बळावर सामाजिक, राजनीतिक, धार्मिक अशी क्रांती घडवून आणली. तसेच महान युगप्रवर्तक, क्रांतिकारक, महान अर्थशास्त्रज्ञ, जगात भारताची मान आदराने उंचावणारे विश्वरत्न, राष्ट्रनिर्माते, प्रज्ञासूर्य,बोधिसत्व, महामानव जगातील आदर्श राज्यघटनाकार, भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सांगितले व पुढे म्हणाले की, एकमेव विद्यार्थी ज्यांच्या शाळेचा पहिला दिवस हा विद्यार्थी दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यांनी पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना देखील समान हक्काचा कायदा निर्माण केला. मुकनायक, समता,जनता, प्रबुद्ध भारत यासारख्या वर्तमानपत्रांतून शोषितांचा आवाज बुलंद केला. श्रीमंत असो वा गरीब सर्वांसाठी एकच मताचा अधिकार बहाल केला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संदीपान पवार, सचिव परेश घोडे, संचालक पांडुरंग गाडगे, दत्ता गाडगे , नारायण डुकरे, प्राचार्य प्रल्हाद शिंदे, प्रा. अनिल पडवळ आदी मान्यवर उपस्थित होते.

# राज्यघटनेचा आदर करावा : मा. पांडुरंग पवार



जुन्नर
जनप्रवास । प्रतिनिधी :

श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती निमित्ताने जि प स पांडुरंग पवार यांनी डॉ.आंबेडकरांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून मनोगत व्यक्त करताना म्हणाले जगातील एकमेव व्यक्ती की ज्यांनी रक्ताचा एक थेंबही न सांडता आपल्या लेखणीच्या बळावर सामाजिक, राजनीतिक, धार्मिक अशी क्रांती घडवून आणली. तसेच महान युगप्रवर्तक, क्रांतिकारक, महान अर्थशास्त्रज्ञ, जगात भारताची मान आदराने उंचावणारे विश्वरत्न, राष्ट्रनिर्माते, प्रज्ञासूर्य,बोधिसत्व, महामानव जगातील आदर्श राज्यघटनाकार, भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सांगितले व पुढे म्हणाले की, एकमेव विद्यार्थी ज्यांच्या शाळेचा पहिला दिवस हा विद्यार्थी दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यांनी पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना देखील समान हक्काचा कायदा निर्माण केला. मुकनायक, समता,जनता, प्रबुद्ध भारत यासारख्या वर्तमानपत्रांतून शोषितांचा आवाज बुलंद केला. श्रीमंत असो वा गरीब सर्वांसाठी एकच मताचा अधिकार बहाल केला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संदीपान पवार, सचिव परेश घोडे, संचालक पांडुरंग गाडगे, दत्ता गाडगे , नारायण डुकरे, प्राचार्य प्रल्हाद शिंदे, प्रा. अनिल पडवळ आदी मान्यवर उपस्थित होते.

DVP College Rajuri

19

193

2022

१९

श्रमसंस्कार
वृक्षारोपण

D V P College
Nimgaon Sawa

# किल्ले नारायणगडावर विशेष श्रमसंस्कार शिबिर

## गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिली शिबिराला भेट



खोडद (ता. जुन्नर) : येथे शिबिराला भेट देताना गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, आमदार अतुल बेनके, पांडुरंग पवार विद्यार्थी.

बेल्हे, दि. २१ (वार्ताहर) - निमगावसावा (ता. जुन्नर) श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर खोडद (गडाचीवाडी) येथे पार पडले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी नारायणगावचे पोलीस उपनिरीक्षक पृथ्वीराज ताटे, जुन्नर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष सूरज वाजगे, विघ्नहरचे संचालक कुंडलिक गायकवाड, सरपंच मनीषा गुळवे उपस्थित होते. या शिबिरास महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, आमदार अतुल बेनके, जि. प.चे माजी उपाध्यक्ष व विद्यमान सदस्य पांडुरंग पवार यांनी सदिच्छा भेट दिली. शिबिर कालावधीत विद्यार्थ्यांनी [illegible] अभियान, साक्षरता, महिला जागृती, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, जलसाक्षरता आदी कामे केली. शिबिराचा समारोप सोमवारी (दि. २१) तहसीलदार रवींद्र सबनीस, पंचायत समितीचे माजी उपसभापती शिवाजीराव चव्हाण यांच्या उपस्थितीत झाला. [illegible] संस्थापक पांडुरंग पवार, [illegible] काळे, सरपंच मनीषा गुळवे, [illegible] काळे, रवींद्र [illegible] उपस्थित होते. शिबिराचे आयोजन प्राचार्य प्रा. प्रल्हाद शिंदे, कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रकाश कांबळे, सहअधिकारी प्रा. छाया चक्कर व प्रा. आशिष [illegible] यांनी केले.

प्रभात Tue, 22 February 2022
https://epaper.eprabhat.net/...

20

# खोडदला श्रमसंस्कार शिबिर

खोडद : पुढारी वृत्तसेवा

निमगावसावा (ता. जुन्नर) येथील श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचालित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे खोडद (गडाचीवाडी) येथे नुकतेच पार पडले. सात दिवसांच्या या शिबिरात विद्यार्थ्यांनी नारायणगड स्वच्छता अभियान, साक्षरता प्रसार, महिला जाणीव जागृती, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, जलसाक्षरतेबाबत मार्गदर्शन केले. तसेच व्याख्याने, गटचर्चा, सर्वेक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम आदी उपक्रमांचे आयोजन केले. शिबिरास गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, आ. अतुल बेनके यांनी सदिच्छा भेट दिली.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी नारायणगावचे पोलिस उपनिरीक्षक पृथ्वीराज ताटे, राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष सूरज वाजगे, कुंडलिक गायकवाड, मनीषा गुळवे आदी उपस्थित होते. जि. प.चे माजी उपाध्यक्ष पांडुरंग पवार यांनी शिबिरास भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनीही शिबिरास शुभेच्छा दिल्या. डॉ. श्रीकांत फुलसुंदर, प्रा. अमोल बिबे, संस्था अध्यक्ष संदिपान पवार, सचिव मनेश घोडे, सरपंच किशोर घोडे यांनी शिबिरास भेट दिली. शिबिराचा समारोप तहसीलदार रवींद्र सबनीस यांच्या उपस्थितीत आणि माजी उपसभापती शिवाजीराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. शिबिराचे आयोजन प्राचार्य प्रल्हाद शिंदे, कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रकाश कांबळे, सहअधिकारी प्रा. छाया चक्कर, प्रा. आशिष पाखरे यांनी केले.



खोडदला आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरास गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी भेट दिली.

दै. पुढारी . दि. २२ फेब्रुवारी 2022

# दिलीप वळसे पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निमगाव सावा,ता.जुन्नर,जि.पुणे.

## नियमित कार्यक्रम अहवाल सन २०२१-२२

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित दिलीप वळसे पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निमगाव सावा,ता.जुन्नर,जि.पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध कार्यक्रम घेण्यात आले.त्याचे विवेचन पुढील प्रमाणे

दिनांक.८ सप्टेंबर २०२१ रोजी दिलीप वळसे पाटील महाविद्यालयात **"साक्षरता दिन"** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या प्रसंगी प्रा.सुभाष घोडे यांनी विद्यार्थ्यांना निरक्षरता ही मानवाच्या जीवनातील सर्वात मोठा अभिशाप आहे. साक्षरता म्हणजे फक्त वाचून नसून किंवा पदवी संपादन करणे नव्हे तर लोकांचे हक्क अधिकार कर्तव्य यांची जाणिव करुन घेणे म्हणजे साक्षरता होय.

दि.१२ नोव्हेंबर २०२१ दिलीप वळसे पाटील महाविद्यालयात **"कोरोना दिन जनजागृती"** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रल्हाद शिंदे सर यांनी कोरोना व्हायरस काय आहे ? या व्हायरसचा प्रसार कसा होतो ? या आजारात प्रतिबंध करण्यासाठी काय उपाययोजना आवश्यक आहेत याबाबत माहिती देत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली या प्रसंगी डॉ.वर्षा गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

दि.२६ नोव्हेंबर २०२१ रोजी दिलीप वळसे पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात **"संविधान दिन"** साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रल्हाद शिंदे सर उपस्थित होते प्रा.सुभाष घोडे सरांनी आपल्या मनोगतातून संविधान सरनाम्याचे वाचन केले.तसेच सर्वांनी नेहमी संविधानाप्रति आदर ठेवून संविधानाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आचरण करावे असे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.

दि.६ डिसेंबर २०२१ रोजी दिलीप वळसे पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा **"महापरिनिर्वाण दिन"** साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष मा.श्री संदिप पवार साहेब हे उपस्थित होते.आपल्या महाविद्यालयातील प्रा.शितल कांबळे मॅडम यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अतिशय छान विचार शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा असे मत व्यक्त केले.

दि.३ जानेवारी २०२२ रोजी दिलीप वळसे पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात **"सावित्रीबाई फुले जयंती"** साजरी करण्यात आली. महाविद्यालयातील प्रा.प्रियंका डुकरे मॅडम यांनी सावित्रीबाई या भारतातील पहिल्या महिला शिक्षीका होय स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या विद्येची जननी व समस्त स्त्रियांना उजेडाची वाट दाखवणारी महिला म्हणजे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले होय असे मत व्यक्त केले.

दि.१२ जानेवारी २०२२ रोजी दिलीप वळसे पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त **"युवा दिन"** साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रकाश कांबळे सर यांनी केले. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.त्यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना आपल्या राष्ट्राची ओळख सर्वदूर पसरविणारे यांच्या विचारांना वाचून शरीरात नव्या ऊर्जेचे स्रोत उत्पन्न होते असे मत व्यक्त केले.

दि.२७ जानेवारी २०२२ रोजी दिलीप वळसे पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात **"योगा दिन"** साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे सौ.अंजली पारगावकर मॅडम उपस्थित होत्या.त्यांनी सध्याच्या धावत्या जीवनासाठी वेळ काढून प्रत्येकाने योगा केला पाहिजे योगाचे महत्व पटवून दिले रोजच्या दैनदिन जीवनामध्ये आहारा विषयी महत्व पटवून दिले इ.विषयी सखोल मागर्दर्शन केले.

दि.११ फेब्रुवारी २०२२ रोजी दिलीप वळसे पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने **"ग्रामस्वच्छता"** राबविण्यात आली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गावचा परिसर रस्ते मंदिर परिसर स्वच्छता स्मशानभूमी परिसर स्वच्छता इ.कामे विद्यार्थ्यांनी केली.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य तसेच सर्व प्राध्यापक व ग्रामस्थ यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्वच्छता करण्यात आली.श्रमदान झाल्यानंतर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

दि.२५ फेब्रुवारी २०२२ दिलीप वळसे पाटील कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय **"मतदार दिन"** साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रल्हाद शिंदे सर व सर्व प्राध्यापक उपस्थित होते सुभाष घोडे सरांनी राष्ट्रीय मतदार दिन या बद्दल विशेष मार्गदर्शन केले.मतदान करणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे आणि तो प्रत्येकाने बजावला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

दि.२७ फेब्रुवारी २०२२ रोजी दिलीप वळसे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात **"मराठी राजभाषा दिन"** साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष श्री संदीप पवार हे उपस्थित होते.महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रल्हाद शिंदे

सर यांनी आपल्या मनोगतातून लाभले भाग्य आम्हास बोलतो मराठी जाहले खरेच धन्य ऐकतो मराठी धर्म पंथ जात एक जाणतो मराठी एवढ्या जगात माय मानतो मराठी त्याचप्रमाणे मराठी भाषेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले व मराठी राजभाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

दि.५ मार्च २०२२ रोजी दिलीप वळसे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात **"वृक्षारोपण"** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री रमेश खरमाळे हे उपस्थित होते.त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य व सर्व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.श्री रमेश खरमाळे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना 'झाडे लावा, झाडे जगवा' असा संदेश दिला.तसेच महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रकाश कांबळे व सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांना एकत्रित घेऊन वृक्षारोपण केले.

दि.८ मार्च २०२२ दिलीप वळसे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात **"जागतिक महिला दिन"** साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्रतिनिधी सौ.कविता पवार मॅडम या उपस्थित होत्या.प्रा.मंगल उनवणे,प्रा.मोनिका जाधव,प्रा.प्रियंका डुकरे यांनी विद्यार्थी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जागतिक महिला दिनानिमित्त मार्गदर्शन केले.खऱ्या अर्थाने महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत तोच खरा महिला दिन असा संदेश देण्यात आला.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
दिलीप वळसे पाटील कला व वाणिज्य
महाविद्यालय,निमगाव सावा
ता.जुन्नर, जि.पुणे

DVP College Nimgaonsawa

प्रभारी प्राचार्य
दिलीप वळसे पाटील
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
निमगांवसावा ता.जुन्नर (पुणे) ४१० ५०४

NSS 2022

19

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित,
श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित,
**दिलीप वळसे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**
निमगाव सावा ता. जुन्नर जि. पुणे पिन. 410 504

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

**विशेष हिवाळी शिबिर अहवाल 2022 - 23**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व दिलीप वळसे पाटील कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय निमगाव सावा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर व मु. पो. पिंपरखेड ता. शिरूर जिल्हा पुणे येथे शुक्रवार दिनांक 30/12/2022 ते गुरुवार 05/01/2023 रोजी पार पडले.

राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबिर कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाला मा. राजेंद्रजी गावडे संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती शिरूर. मा. राजेश विठ्ठलराव दाभाडे सरपंच ग्रामपंचायत पिंपरखेड. मा. अरुण सावळेराम ढोमे अध्यक्ष, ग्रामविकास शिक्षण मंडळ पिंपरखेड मा. किरण बजरंग ढोमे चेअरमन, पिंपरखेड वि.का.स.सोसायटी इत्यादी बहुसंख्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री पांडुरंगजी पवार साहेब पुणे जिल्हा परिषद सदस्य हे होते. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. छाया जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. डॉ.दत्तात्रय चव्हाण, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ. शाकुराव कोरडे, प्रा. प्रल्हाद शिंदे, प्रा. प्रकाश कांबळे, प्रा. सुभाष घोडे. प्रा.ज्योती गायकवाड, प्रा. प्रवीण गोरडे सह कार्यक्रमाधिकारी, प्रा. मोनिका जाधव सह कार्यक्रमाधिकारी आणि राष्ट्रीय सेवा योजना शिबिरार्थी स्वयंसेवक व बहुसंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**1) पहिला दिवस 30/12/2023 :** उद्घाटन समारंभ - सकाळी 11:00 ते 1:00 उद्घाटन समारंभ संपन्न झाला. त्या नंतर विद्यार्थ्यांनी जिल्हा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपरखेड येथे करण्यात आलेल्या निवास व्यस्थेच्या ठिकाणी साफसफाई केली व 3:30 वा. बौद्धिक सत्राला सुरुवात झाली. **शिबिरातील पहिले व्याख्यान बँक ऑफ महाराष्ट्र शाखा पिंपरखेड चे शाखाप्रदा प्रबंधक अखिलेश कुमार यादव व यांनी आर्थिक साक्षरता व ग्रामीण युवक** या विषयावर तर दुसरे व्याख्यानात डॉ. शाकुराव कोरडे यांनी संवेदना हरवलेला समाज या विषयावर मार्गदर्शन केले. जेवणानंतर विद्यार्थ्याचे गट पाडून गटांना नावे देऊन पुढील दिवसाच्या कामकाजाचे नियोजन करण्यात आले. गटांच्या विभागणीनुसार स्वयंपाक करणे, पाणी तापवण्यासाठी लाकडे जमा करणे, स्टेज व्यवस्था करणे, पाहुण्यांचे स्वागत करणे अशी कामांची विभागणी करण्यात आली. रात्री 10:00 वाजता शुभ रात्री करण्यात आली

**2) दुसरा दिवस 31/12/2023 :** सकाळी 5:00 वाजता प्रा. सचिन ब-हाटे यांच्या समवेत योगासनाने दिवसाची सुरुवात झाली 5:00 ते 6:30 या वेळात विविध सर्वांग सुंदर व्यायाम व योगासने घेण्यात आली 7:00 वाजता प्रार्थना झाली. त्यानंतर नाश्ता केल्यानंतर 8:00 वाजता श्रमसंस्कारास सुरुवात झाली. पिंपरखेड गावातील स्मशानभूमी श, श्री महादेव मंदिर परिसरात विद्यार्थ्यांनी स्वच्छता साफसफाई व वृक्षांना आळी बनवली स्मशानभूमी बाहेरील परिसरात नदीच्या बाजूने चिंचेची झाडे लावून त्यांना पाणी घातले. जेवण व विश्रांतीनंतर 3:00 वाजता व्याख्यानमालेत मा. दिपक शिंदे यांनी कार्पोरेट क्षेत्रातील संधी याविषयी तर डॉ. दत्तात्रय चव्हाण यांनी सेंद्रिय शेती आणि ग्रामीण रोजगार याविषयी सखोल मार्गदर्शन केले. जेवणानंतर गटचर्चेदरम्यान विद्यार्थ्यांनी आपली मनोगते मांडली व दुसऱ्या दिवसाचे नियोजन करून शुभ रात्रि करण्यात आली.

**3) तिसरा दिवस 01/01/2023 :** तिसऱ्या दिवसाची सुरुवात नियोजित दिनचर्येप्रमाणे योगासनाने होऊन प्रार्थनेनंतर प्रभात फेरी दरम्यान चौकात स्त्रीभ्रूणहत्या बंदी व लेक वाचवा लेक शिकवा हे पथनाट्य सादर केले श्री दत्त मंदिर आणि श्री तुकाई देवी मंदिर परिसरात स्वच्छता आणि साफसफाई करून झाडांना आळी करून झाडांना पाणी देण्यात आले.

बौद्धिक सत्रात शासकीय आश्रम शाळा गोहे ता.आंबेगाव येथील व्याख्याते प्रा.दत्तात्रय डुकरे यांनी राष्ट्र उभारणीत युवकांचे योगदान या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांच्या भेटी घेऊन गावातील विविध बाबींची माहिती मिळवली.

**4) चौथा दिवस 02/01/2023 :** सात वाजता प्रार्थना संपल्यानंतर गावात प्रभात फेरी काढून चौकात बिबट्या आला रे बिबट्या आला हे जनजागृती पर पथनाट्य सादर केले नाश्ता उरकून श्री बुवा महाराज मंदिर आणि श्री खंडोबा मंदिर परिसरात विद्यार्थ्यांनी साफसफाई व स्वच्छता केली. 3:00 वाजता प्रा. बापूसाहेब शिंदे यांनी उद्योजकता व व्यक्तिमत्व विकास आणि प्रा. ज्योती गायकवाड यांनी महिला सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन केले. नंतर ग्राम सर्वेक्षणाद्वारे विदयार्थ्यांनी गावात आलेल्या पहिल्या गोष्टींच्या नोंदी व इतिहास जाणून घेतला. जेवणानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

**5) पाचवा दिवस 03/01/2023 :** नियोजित दिनचर्येप्रमाणे व्यायाम, योगा व प्रार्थनेनंतर प्रभात फेरी दरम्यान बालविवाह बंदी वर प्रबोधन पर पथनाट्य सादर केले. 8:00 वाजता श्रमदानास सुरुवात झाली. बुवा महाराज मंदिर परिसरातील मोकळया जागेवर साफसफाई करून चिंचेची झाडे लावून त्यांना पाणी घालण्यात आले बौद्धिक सत्रात 3:00 वाजता गाडगे यांनी शेती पूरक व्यवसाय व ग्रामीण विकास या विषयावर तर राष्ट्रीय सेवा योजना चे जिल्हा समन्वयक डॉ श्रीकांत फुलसुंदर यांनी ग्रामीण विकास आणि राष्ट्रीय सेवा योजना या विषयावर व्याख्यान दिले व नंतर विद्यार्थ्यांचे बौद्धिक व मनोरंजनात्मक खेळही घेतले नंतर ग्राम सर्वेक्षणाद्वारे गावातील विविध गोष्टींविषयी माहिती घेण्यात आली. या दिवशी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री. पांडुरंगजी पवार साहेब उपस्थित होते त्यांनी विद्यार्थ्यांना दळणवळण हा शब्द गटचर्चेसाठी देऊन विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाने दिवसाची सांगता झाली.

**6) सहावा दिवस 04/01/2023 :** सहाव्या दिवसाची सुरुवात नियोजित दिनचर्याप्रमाणे झाली नाश्ता झाल्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या आवारात सुनियोजित पद्धतीने विविध फुलझाडांची लागवड केली व शाळेच्या मागील बाजूस व्यायामाच्या साहित्याची योग्य प्रकारे उभारणी केली. 3:00 प्रा सचिन ब-हाटे यांनी व्यक्तिमत्व विकास या विषयावर तर त्यानंतर राष्ट्रपती पदक विजेते सेवानिवृत्त पोलीस अधिकारी मा. दयानंद ढोमे साहेब यांनी आजचा युवक आणि कायदा सुव्यवस्था या विषयावर मार्गदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रमाने दिवसाची सांगता झाली

**7) सातवा दिवस 05/01/2023 :** नियोजित दिनचर्या दिवसाची सुरुवात होऊन नाश्ता केल्यानंतर विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद शाळा परिसर स्वच्छता व साफसफाई केली त्यानंतर समारोपाच्या कार्यक्रमाची तयारी करण्यात आली. शिबिराच्या समारोप समारंभासाठी पिंपरखेड गावाचे विद्यमान सरपंच मा. राजेश दाभाडे, उपसरपंच विकास वरे ग्रामविकास शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. अरुण ढोमे, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन मा. किरण ढोमे ग्रामपंचायत सदस्य मा. शितलताई शेळके, मा. रंगनाथशेठ शेळके, मा. बाळासाहेब ढोमे, मा. अमोल ढोमे आदी बहुसंख्य मान्यवर व महाविद्यालयाचे बहुसंख्य प्राध्यापक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांकडून व ग्रामस्थांकडून स्वयंसेवक शिबिरार्थींचे व प्राध्यापक वर्गाचे कौतुक करण्यात आले. स्वयंसेवक विद्यार्थ्यांना उत्कृष्ट गट, उत्कृष्ट स्वयंसेवक, विशेष बदल, इत्यादी विविध पारितोषीके देण्यात आली.


NSS 2022-23 198

# पिंपरखेड येथे विद्यार्थ्यांचे श्रमसंस्कार शिबिर

**पिंपरखेड : पुढारी वृत्तसेवा**

पिंपरखेड येथे श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचालित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (निमगाव सावा) यांचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर झाले.

पहाटे शुभ प्रभात, योग, प्रभात फेरी, श्रमदान, व्याख्याने, गटचर्चा, सांस्कृतिक कार्यक्रम या दिनचर्येतून राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ग्रामवासीयांना आदर्श घालून दिला. स्वयंसेवकांनी पिंपरखेड ग्राम, तुकाईमाता व दत्त मंदिर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसर स्वच्छता करून स्मशानभूमी व शाळेत वृक्षारोपण इत्यादी श्रमदानाची कामे केली.



पिंपरखेड स्मशानभूमी परिसरात श्रमदान करताना विद्यार्थी. (छाया : आबाजी पोखरकर)

शिबिर स्वयंसेवकांसाठी विविध तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी प्रवीण गायकवाड, उपसरपंच विकास वरे, माऊली ढोमे, किरण ढोमे, प्रा. प्रल्हाद शिंदे, बाबूराव राक्षे आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. शिबिरार्थी विद्यार्थी पवन पवार, गौरी सरजिने, ओमकार खामकर, निकिता पानसरे या विद्यार्थ्यांनी शिबिरातील आठवणींना उजाळा दिला. या प्रसंगी सरपंच राजेंद्र दाभाडे, ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष अरुण ढोमे, बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापक अखिलेश यादव, प्रा. प्रल्हाद शिंदे, उपाध्यक्ष नवनाथ पोखरकर, माऊली ढोमे, बाळासाहेब ढोमे, रंगनाथ शेळके, पी. सी. बारहाते, सुभाष कोरडे, प्रा. सचिन बराटे तसेच दिलीप वळसे पाटील महाविद्यालयातील प्रा. अनिल पडवळ, प्रा. सुभाष घोडे, प्रा. प्रकाश कांबळे, प्रा. आशिष गाडगे, प्रा. ज्योती गायकवाड, नीलम गायकवाड, प्रा. माधुरी भोर, प्रा. नंदा आहेर आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दत्तात्रय चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शाकुराव कोरडे यांनी केले. प्रा. मोनिका जाधव यांनी आभार मानले.

दै. पुढारी 10 जानेवारी 2023

# गावकऱ्यांना लोकसहभाग, स्वच्छतेचे धडे

**जांबूत, दि.८ (वार्ताहर)-** पिंपरखेड (ता. शिरूर) येथे श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निमगाव सावा यांचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर पार पडले.

पहाटे शुभ प्रभात, योगा, प्रभात फेरी, चहा नाष्टा, श्रमदान, भोजन, विश्रांती, व्याख्याने, गटचर्चा भोजन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि शुभरात्री अशा दिनचर्येतून स्वयंसेवकांनी पिंपरखेड ग्रामवासियांना आदर्श घालून दिला. शिबिरादरम्यान राष्ट्रीय स्वयंसेवक यांनी पिंपरखेड येथील स्मशानभूमीतील साफसफाई, ग्रामस्वच्छता तुकाईमाता व दत्त मंदिर परिसर स्वच्छता, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसर स्वच्छता, स्मशानभूमी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वृक्षारोपण आदी श्रमदानाची कामे शिबिर कालावधीमध्ये केली. शिबिर कालावधीमध्ये श्रमदानाबरोबरच, स्वयंसेवकांसाठी विविध तज्ज्ञ मार्गदर्शकाच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते.

युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास संकल्पना घेऊन हे शिबिर झाले. यावेळी प्रवीण गायकवाड, उपसरपंच विकास वरे, माऊली ढोमे, किरण ढोमे, प्रा. प्रल्हाद शिंदे, बाबुराव राक्षे आदींनी मनोगत व्यक्त केले. शिबिरार्थी विद्यार्थी पवन पवार, गौरी सरजीने, ओमकार खामकर, निकिता पानसरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच राजेंद्र दाभाडे, ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष अरुण ढोमे, बँक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापक अखिलेश यादव, प्रा. प्रल्हाद शिंदे, उपाध्यक्ष नवनाथ पोखरकर, माऊली ढोमे,बाळासाहेब ढोमे, रंगनाथ शेळके, पी. सी. बारहाते, सुभाष कोरडे, प्रा सचिन बराटे, प्रा. अनिल पडवळ, प्रा. सुभाष घोडे, प्रा.प्रकाश कांबळे, प्रा. आशिष गाडगे, प्रा. ज्योती गायकवाड, नीलम गायकवाड, प्रा. माधुरी भोर, प्रा. नंदा आहेर उपस्थित होते

समारोपप्रसंगी डॉ. दत्तात्रय चव्हाण यांनी प्रास्ताविक, तर सूत्रसंचालन डॉ. शाकुराव कोरडे यांनी केले. प्रा. मोनिका जाधव यांनी आभार मानले.

दै. प्रभात 09 जानेवारी 2023

# आजादी का अमृत महोत्सव
2022

DVP College






D V P College
Nimgaon Sawa

20



झाडे लावा,
झाडे जगवा

# वृक्षारोपण [2021]

DVP College ... Nimgaon Sawa





# हर घर तिरंगा (2022)

DVP College
Nimgaon Sawa

203






# राष्ट्रीय मतदार दिन

(2021)

DVP College




# रक्षाबंधन उपक्रम
(2021)

P College
mgaon Sa



# युवादिन 2022

DVP College
Niragaon Sawa
20



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित व श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान दिलीप वळसे पाटील
कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय निमगाव सावा,ता.जुन्नर, जि.पुणे

# निर्भया कन्या अभियान

गुरुवार दिनांक 17 नोव्हेंबर 2022 रोजी सकाळी 11 वाजता महाविद्यालयाच्या भव्य अशा सभागृहात निर्भय कन्या अभियान सर्व विद्यार्थिनी व सर्व शिक्षिका प्राध्यापक वर्ग यांच्या उपस्थितीत मोठ्या जल्लोषात संपन्न झाला.

समारंभाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. छाया जाधव मॅडम यांनी भूषविले होते. सुप्रसिद्ध अध्यक्ष महिला रा. कॉ. युवती पार्टीच्या अध्यक्ष मा अक्षदाताई मांडे तसेच मा.सीमाताई त्याचबरोबर आशाताई बांगर पोलीस कॉन्स्टेबल या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

या अभियानास महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व प्राध्यापिका वर्ग व सर्व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचा आरंभ प्रमुख पाहुण्यांचे स्वागत आणि करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. दीपप्रज्वलनानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्य यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला. त्यानंतर प्राध्यापिका जाधव मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, त्याचबरोबर सादर होणाऱ्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मा अक्षदाताई मांडे त्यांनी विद्यार्थिनी सोबत संवाद साधला. त्याचबरोबर त्यांनी त्यांच्या जीवनातील विविध प्रसंगांना उजाळा दिला. त्यांनी निर्भय कन्या बद्दल मुलींसोबत संवाद साधला त्याचबरोबर सीमाताई राघवतान व सौ.आशाताई बांगर यांनी जी मुली सोबत निर्भय कन्या या विषयावर संवाद साधला

त्यानंतर प्रा. डॉ. छाया जाधव मॅडम यांनी त्यांच्या जीवनातील काही प्रसंगांना उजाळा दिला. त्यानंतर विद्यार्थी मनोगत करण्यासाठी महाविद्यालयातील दोन-तीन विद्यार्थिनींचे मनोगत झाले. त्यानंतर दोन-तीन तास रंगलेल्या कार्यक्रमाची सांगता प्रमुख पाहुण्यांचे आभार मानून करण्यात आली.

D V P College
Nimgaon Sawa





महिला उदयोजकत्ता

दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, निमगाव सावा"

DVP College Nimgaon Sewa

महिला सबलीकरण मंच
जागर स्त्री शक्तीचा

दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात "जागर स्त्री शक्तीचा" या उपक्रमाअंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित महिला प्राध्यापिका व विद्यार्थिनींनी पारंपारिक वेशभूषा करून आपला सांस्कृतिक वारसा जपला.

कार्यक्रमाचे उद्घाटन सरस्वती पूजनाने व स्वागत पद्याने करण्यात आले. यावेळी सर्व महिला भगिनींनी 'स्त्री जन्माचे स्वागत करा' अशी सामुहिक शपथ घेतली. या उपक्रमाअंतर्गत फुगडी, दांडिया, संगीत खुर्ची इ. खेळ उत्स्फुर्तपणे खेळून महिलांनी व विद्यार्थिनींनी मनमुराद आनंद लुटला. यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. निलम गायकवाड व प्रास्ताविक प्रा. पाटे मॅडम यांनी केले. राष्ट्रवादी युवती काँग्रेस अध्यक्षा अक्षदा मांडे यांनी मुलींना मार्गदर्शन केले.

या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थिनींची हिमोग्लोबीन तपासणी केली गेली. याप्रसंगी श्री शक्तीग्राम संघाच्या अध्यक्षा अपेक्षा टाकसाळे, सचिव छाया घोडे, सारिका पतसंस्थेच्या अध्यक्षा मनिषा घोडे, आरोग्य सेविका शीतल कोकाटे, डॉ. बोरा, विद्यानिकेतन इंटरनॅशनलच्या प्राचार्या रुपाली भालेराव आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. छाया जाधव, प्रा. निलम गायकवाड, संस्था प्रतिनिधी कविता पवार, महाविद्यालयीन प्राध्यापिका, विद्यार्थिनी तसेच निमगावसावा गावातील महिला व बचत गटातील महिला आदींचा समावेश / सहभाग होता.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक पांडुरंग पवार साहेब, अध्यक्ष संदिपान पवार, सचिव परेश घोडे यांनी प्रोत्साहन दिले. प्राध्यापिका गायकवाड जे. एस. यांनी आभार मानले.

Gaikwad
[Gaikwad J.S.]

209

# 'जागर स्त्री शक्तीचा'

DVP College
Nimgaon Sawa






# पाककला स्पर्धा

D.V.P. College
Nimgaon Sawa






D V P College
Nimgaon Sawa

दि - 27- फेब्रुवारी 2023

## मराठी भाषा गौरव दिन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सलग्नित व श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निमगाव सावा. येथे दिनांक 27 फेब्रुवारी 2022 रोजी मराठी भाषा गौरव दिन संपन्न झाला. यावेळी बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव येथील मराठी विभाग प्रमुख व प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या वेळी डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर यांच्या हस्ते मराठी विभाग आयोजित भित्तीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. छाया जाधव, महाविद्यालयातील सर्व कर्मचारी वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शक डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर यांनी कविवर्य ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांच्या जीवन व कार्याचा आढावा घेतला. तसेच कुसुमाग्रजांसोबत झालेली आपली भेट व अनुभव यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. स्वरचित काही कविता आणि समग्र साहित्याचा आढावा घेत मराठी साहित्यातील कुसुमाग्रजांचे स्थान त्यांनी अधोरेखित केले.

विद्यार्थ्यांना साहित्याची प्रेरणा स्पष्ट करून सांगितली. आपल्या मधूनही कवी, लेखक निर्माण होऊ शकतात त्यासाठी वाचन मनन चिंतनाची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. छाया जाधव मॅडम यांनी देखील विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करत मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मराठी विभाग प्रमुख प्रा. प्रल्हाद शिंदे कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर आभार मराठी विभागातील प्रा. आशिष गाडगे यांनी मानले महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व मराठी विभागातील सर्व विद्यार्थी या प्रसंगी उपस्थित होते.

D V P College
Nimgaon Sawa

212



" मराठी भाषा दिन "




Principal
Dilip Walase Patil
Arts, Commerce & Science College
Nimgaonsawa, Tal.Junnar (Pune)